


| वर्ष - 9 | अंक - 152 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

सोमवार, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त महाईन्यूज कार्यालयास सुट्टी राहणार असल्याने मंगळवार दिनांक २७ जानेवारी २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार व हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
- संपादक

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 26 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

# पोल्ट्री शेडमध्ये सुरू होती एमडी ड्रग्ज निर्मिती; अनेक संशयित ताब्यात




**महाईन्यूज**

**सातारा : महसूल गुप्तचर संचालनालयाने (DRI) सातारा जिल्ह्यात केलेल्या कारवाईत तब्बल 6000 कोटींचे एमडी ड्रग्ज जप्त केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. कराड तालुक्यातील पाचुपतेवाडी या गावातील मोकळ्या पोल्ट्री शेडवर तीन आयपीएस अधिकाऱ्यांच्या पथकाने धाड टाकली असता त्या ठिकाणी ड्रग्ज निर्मितीची फॅक्टरीच उघडकीस आली. याप्रकरणी एका सराईत गुन्हेगारासह काही जणांना ताब्यात घेण्यात आले असून बिहारी तरुणांकडून ड्रग्ज निर्मिती करून घेतली जात होती, असे समजते.**

कराड तालुक्यातील डोंगरी भागात पाचुपतेवाडी हे गाव आहे. कराड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाचुपतेवाडी गावामध्ये एमडी ड्रग्ज तयार करणारी फॅक्टरीच सुरू होती. गावापासून काही अंतरावर असलेल्या मोकळ्या पोल्ट्री शेडमध्ये ड्रग्ज निर्मिती केली जात होती. याबद्दल मिळालेल्या माहितीवरून डीआरआयच्या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या पथकाने शनिवारी सायंकाळी धाड टाकली.

शेडमध्ये एमडी ड्रग्ज आणि कच्चा माल जप्त करण्यात आला. तसेच संशयितांना ताब्यात घेऊन पोल्ट्री शेड सील करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची किंमत सहा हजार कोटी रूपये असल्याचे सांगितले जात आहे.

घटनास्थळावरून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, रेकॉर्डवरील एका अट्टल गुन्हेगाराने काही बिहारी तरूणांना हाताशी धरून रिकाम्या पोल्ट्री शेडमध्ये अंमली पदार्थांचे उत्पादन सुरू केले होते. पत्र्याच्या शेडला बाजूने लोखंडी जाळी आहे. शेडमध्ये काय चाललंय हे बाहेरून दिसू नये म्हणून जाळीला प्लास्टिकचा कागद बांधण्यात आला आहे. शेडमध्ये अत्यंत गुप्तपणे ड्रग्ज निर्मिती केली जात होती. घटनेपासून काही अंतरावर कराड ग्रामीण पोलीस ठाण्याचे दूरक्षेत्र आहे. मात्र, स्थानिक पोलिसांना त्याचा कसलाही सुगावा नव्हता. डीआरआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शनिवारी सायंकाळी छापा टाकून ड्रग्ज निर्मितीची फॅक्टरी



उध्वस्त केली. या कारवाईची माहिती देखील सातारा जिल्हा पोलीस अथवा कराड ग्रामीण पोलिसांना नव्हती.

सध्या महसूल गुप्तचर संचालनालयाकडून (डीआरआय) या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या ड्रग्ज निर्मिती रॅकेटमध्ये आणखी कोणाचे हात गुंतले आहेत का? हे तपासात स्पष्ट होईल मात्र, या धडक कारवाईमुळे ड्रग्ज निर्मिती करणाऱ्या माफियांचे धाबे दणाणले आहेत. पोलिसांना देखील या कारवाईने मोठी चपराक बसली आहे. जिल्ह्यातील पोलीस अधिकारी किरकोळ कारवाया करून स्वतःची पाठ थोपटून घेतात. परंतु, अंमली पदार्थ निर्मितीची फॅक्टरी सुरू असल्याचा सुगावा त्यांना लागला नाही. यावरून सातारा पोलीस दल सोशल मीडियावर ट्रोल होत आहे.

यासंदर्भात कराडच्या डीवायएसपी राजश्री पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्या म्हणाल्या की, कारवाई बद्दल आम्हाला कसलीच कल्पना दिलेली नाही. त्यामुळे कारवाईत नेमकं काय सापडले हे आम्हाला माहीत नाही. तसेच, कराड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांनी देखील कारवाईबद्दल माहिती नसल्याचे सांगितले. यामुळे एकूणच सातारा जिल्हा पोलीस दलाची नाचक्की झाली आहे.

# ६ फेब्रुवारीला पुण्याला नवे महापौर

## पुण्याला 58 वे व भाजपचे दुसरे महिला महापौर मिळण्याची शक्यता

**महाईन्यूज**

**पुणे: महापालिकेच्या निवडणूक निकालानंतर अवघ्या तीन आठवड्यांत पुणे शहराला नवे महापौर मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुणे महापालिकेने महापौर व उपमहापौर निवडणुकीची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू केली असून, त्यासाठी पीठासीन अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत महापालिकेने विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पत्र पाठविले होते.**




या प्रक्रियेमुळे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात महापौर व उपमहापौर निवड होणार, हे निश्चित झाले होते. नवनिर्वाचित सभागृहाची पहिली विशेष सभा 6 फेब्रुवारीला होणार असून, या सभेत महापौर आणि उपमहापौरांची निवड करण्यात येणार आहे. सकाळी 11 वाजता ही विशेष सभा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

महापालिकेच्या निवडणुकीत सर्वाधिक जागा मिळवणारा भाजप शहरात सत्ता स्थापन करणार हे निश्चित आहे. त्यामुळे महापौर आणि उपमहापौर हे दोन्ही पदे भाजपकडेच जाण्याची शक्यता असून, या पदांसाठी इच्छुकांमध्ये चुरस वाढली आहे. महापौरनिवडीच्या दिवशी नवनिर्वाचित नगरसेवकांची पहिली अधिकृत सभा होणार असून, त्याच सभेत पुण्याला 58 वे महापौर मिळणार आहेत. मात्र, ही संधी कोणाला मिळणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

या वेळी पुणे महापालिकेचे महापौरपद सर्वसाधारण (महिला) प्रवर्गासाठी राखीव आहे. निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सर्व राजकीय पक्षांची गटनोंदणी विभागीय आयुक्तांकडे करण्यात येते. त्यानंतर मनपाच्या नगरसचिव कार्यालयाकडून महापौर व उपमहापौरनिवडीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर केला जातो. या निवडीनंतर महापालिकेचे सभागृह औपचारिकरीत्या अस्तित्वात येते.

महापौर व उपमहापौरनिवडीचा कार्यक्रम निश्चित करण्यासाठी महापालिका प्रशासनाने विभागीय आयुक्त कार्यालयाकडे शुक्रवारी पत्र पाठवले होते. या पत्राला प्रतिसाद देत विभागीय आयुक्त कार्यालयाशी झालेल्या चर्चेनंतर 6 फेब्रुवारी ही तारीख निश्चित केली आहे. या दिवशी सकाळी 11 वाजता पुणे महापालिकेच्या नवनिर्वाचित सभागृहाची पहिली विशेष सभा होणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. महापौर व उपमहापौर निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही आयुक्त राम यांनी स्पष्ट केले आहे. या निवडणुकीमुळे पुण्याला भाजपच्या दुसऱ्या महिला महापौर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### या पद्धतीने मिळणार पुण्याला महापौर

महापालिकेने विभागीय आयुक्तांकडे पाठविलेल्या पत्रानंतर महापौर व उपमहापौरपदाच्या निवडणुकीसाठी पीठासीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. त्यानंतर महापालिकेची विशेष सभा कधी होणार? याबाबतची माहिती वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध केली जाते आणि विशेष सभेची नोटीस काढली जाते. या कालावधीत महापौर व उपमहापौरपदासाठी इच्छुक उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज स्वीकारले जातात. निवडणुकीच्या दिवशी सभा सुरू झाल्यानंतर उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी 15 मिनिटांची मुदत दिली जाते. एकापेक्षा अधिक उमेदवार रिंगणात असल्यास पीठासीन अधिकारी मतदान प्रक्रिया राबवितात. मतदानानंतर पीठासीन अधिकारी महापौर व उपमहापौरपदी निवडून आलेल्या उमेदवारांची अधिकृत घोषणा करतात.

# ९ वर्षांनंतर जिल्हा परिषद निवडणूक; आजी-माजी नेत्यांची 'एन्ट्री'

**महाईन्यूज**

**पुणे: मिनी मंत्रालय अशी ओळख असलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीचे पडघम वाजले असून, तब्बल 9 वर्षांच्या कालावधीनंतर निवडणुका होत असल्याने पुन्हा एकदा आजी-माजी जिल्हा परिषद सदस्यांनी दंड थोपटले आहेत.**




### चुरशीच्या लढतींकडे लक्ष

अनुभवी माजी सदस्यांची मोठी फौज पुन्हा मैदानात उतरल्याने यंदाच्या जिल्हा परिषद निवडणुकीत चुरशीच्या आणि प्रतिष्ठेच्या लढती पाहायला मिळणार आहे. पुणे महापालिकेत भाजपने एकहाती सत्ता मिळवली आहे. आता जिल्ह्याच्या राजकरणातही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी लढत होणार असल्याने या निवडणुकांत देखील अजित पवार यांना शह देण्याची रणनीती भाजपने आखली आहे. या निवडणुकांत कोण बाजी मारणार? हे 7 फेब्रुवारीला स्पष्ट होणार आहे.

अनेक दिग्गज निवडणूक रिंगणात उतरल्याने पुन्हा एकदा ग्रामीण भागात निवडणुकीचा ज्वर शिगेला पोहचला आहे. अनुभवी चेहऱ्यांसह काही नव्या समीकरणांमुळे जिल्ह्यातील निवडणूक लढती अधिक रंगतदार होणार आहेत.

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यात आले आहेत. एकूण 598 जण निवडणूक रिंगणात आहेत. अर्ज माघारी घेण्याची शेवटची तारीख 27 जानेवारी असून, यातील आणखी काही उमेदवार गळण्याची शक्यता आहे. 9 वर्षांनी निवडणूक होत असल्याने या निवडणुकीला रंगत येणार आहे. महापालिका निवडणुकांप्रमाणे अनेक लढती चुरशीच्या होणार आहेत. या निवडणुकीत अनेक माजी सदस्यांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत. यात काही माजी सभापती व पदाधिकारी यांनी विविध गटांतून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

माजी उपाध्यक्ष रणजित शिवतारे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून भोर तालुक्यातील उत्रौली-कारी या जिल्हा परिषदेच्या गटातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर, भाजपच्या आशा बुचके जुन्नर तालुक्यातील सावरगाव-कुसूर गटातून निवडणुकीच्या रिंगणात उभ्या आहेत. त्यांच्याविरोधात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे गुलाब पारखे निवडणूक रिंगणात आहेत. तर, आंबेगाव तालुक्यातील पारगाव तर्फे अवसरी गटातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी उपाध्यक्ष व माजी मंत्री व आमदार दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे विवेक वळसे पाटील हे निवडणूक लढवत आहेत. तर, तुलसी भोर ह्या कळंब-चांडोली गटातून रिंगणात आहेत.

माजी आमदार अशोक पवार यांच्या पत्नी तसेच कृषी पशुसंवर्धन विभागाच्या माजी सभापती सुजाता पवार ह्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून वडगाव-मांडवगण गटातून निवडणूक लढवत आहेत. भोलावडे शिंद गटातून विठ्ठल आवळे हे भाजपकडून निवडणूक लढवत आहेत. दत्ता झुरंगे हे बेलसर गटातून काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवत असून, वीरधवल जगदाळे हे दौंड तालुक्यातील खडकी-देऊळगावराजे गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मैदानात उतरले आहेत. इंदापूर तालुक्यातील बावडा गटातून माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची कन्या तसेच ठाकरे घराण्याची सून अंकिता पाटील ह्या दुसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून रेखा बांदल या रांजणगाव सांडस गटातून, तर जिल्हा परिषदेच्या माजी महिला व बालकल्याण सभापती पूजा पारगे ह्या खेड-शिवापूर-खानापूर गटातून निवडणूक लढवत आहेत.



## भूमिका

***तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी आणि केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी विधानसभेतील अभिभाषणाच्या घटनात्मक प्रथेला छेद देत अलीकडेच राजकीय वर्तुळात मोठी चर्चा निर्माण केली आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद १७५नुसार, राज्य विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनात राज्यपालांनी अभिभाषण करणे ही घटनात्मक बाब आहे.***

# राजभवनातील 'तडफदारपणा' आणि अभिभाषणाची परंपरा



मात्र ही सर्वमान्य बाब आहे की हे अभिभाषण प्रत्यक्षात मंत्रिमंडळाने लिहिलेले व मंजूर केलेले असते. राष्ट्रपती संसदेपुढे जे अभिभाषण करतात, त्याबाबतही हीच प्रक्रिया लागू होते. या प्रथेची मुळे ब्रिटिश काळातील व्हाइसरॉयच्या भूमिकेत असून, सत्ताधारी सरकारची कामगिरी व धोरणे औपचारिकरीत्या मांडणे, हा त्यामागील उद्देश राहिला आहे.

तमिळनाडूमध्ये राज्यपाल आर. एन. रवी यांनी मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांच्या सरकारने तयार केलेले अभिभाषण वाचण्यास स्पष्ट नकार दिला. एवढ्यावरच न थांबता त्यांनी थेट विधानसभेतून सभात्याग केला. गुंतवणूक, औद्योगिक विकास, कायदा-सुव्यवस्था, सामाजिक सुरक्षितता आणि युवकांच्या परिस्थितीबाबत सरकारने मांडलेले तब्बल तेरा दावे त्यांनी फेटाळले. मात्र हे सर्व आक्षेप त्यांनी सभागृहात न मांडता राजभवनातून जाहीर केले. लेखकाच्या उपरोधिक शैलीनुसार, ही कृती राज्यपालांच्या 'सुसंस्कृत बंडखोरी'चे प्रतीक ठरते. घटनात्मक प्रमुख म्हणून अपेक्षित असलेली अलिप्तता बाजूला ठेवून, त्यांनी सरकारच्या धोरणांवर थेट टीका केली आणि स्वतःची भूमिका ठामपणे मांडली.

केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी मात्र तुलनेने संयत आणि मवाळ भूमिका स्वीकारली. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या डाव्या सरकारने तयार केलेल्या अभिभाषणातील काही भाग त्यांनी वाचले नाहीत, तर काही ठिकाणी बदल केले. तरीही त्यांनी सभात्याग न करता औपचारिकता जपली. त्यामुळे केरळमधील प्रसंग तुलनेने शांततेत पार पडला. विजयन सरकारने नंतर गाळलेला व बदललेला मजकूर अधिकृतपणे सादर करून आपली भूमिका स्पष्ट केली.

यामुळे अभिभाषणाची घटनात्मक प्रक्रिया पूर्ण झाली असली, तरी राज्यपाल आणि सरकारमधील मतभेदही उघड झाले.

तमिळनाडूमधील या घटनेमुळे मुख्यमंत्री स्टालिन संतप्त झाले. राज्यपालांनी अभिभाषण न वाचणे आणि सभात्याग करणे हे घटनात्मक संकेतांचे उल्लंघन असल्याचा आरोप करत त्यांनी राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रथाच रद्द करण्यासाठी घटनादुरुस्तीची मागणी केली.

'लोकसत्ता'च्या भूमिकेनुसार, ही मागणी तत्त्वतः मान्य असली तरी लेखकाने त्यावर उपरोधिक सूचना मांडल्या आहेत. उदाहरणार्थ, केवळ अभिभाषणच नव्हे तर इतरही जुनाट परंपरा रद्द कराव्यात किंवा अशा 'तडफदार' राज्यपालांना वेगवेगळ्या राज्यांत पाठवून त्यांचा उपयोग करून घ्यावा. महाराष्ट्रातील अधिवेशनपूर्व चहापानासारख्या प्रथांचाही यानिमित्ताने उल्लेख करून लेखकाने राजकीय औपचारिकतेवर उपरोध केला आहे.

या साऱ्या घडामोडींमधून एक महत्त्वाचा प्रश्न पुढे येतो— राज्यपालांचा असा सक्रिय हस्तक्षेप लोकशाही अधिक बळकट करतो की घटनात्मक संस्थांमधील संतुलन बिघडवतो? राज्यपाल हे घटनात्मक प्रमुख म्हणून सरकारच्या सल्ल्याने काम करावेत, ही परंपरा आहे.

मात्र अलीकडील घटनांमधून राज्यपाल स्वतःची वैचारिक आणि राजकीय भूमिका अधिक ठळकपणे मांडू लागल्याचे दिसते. उपरोध, टीका आणि प्रशंसेच्या मिश्र शैलीतून हा लेख भारतीय लोकशाहीतील परंपरा, राज्यपालांची भूमिका आणि सत्तासंतुलन यावर नव्याने विचार करण्यास भाग पाडतो.

## प्रासंगिक »

**"सुख संपत्तीत नाही, समाधानात आहे"**

***या कथेतून खऱ्या सुखाचा अर्थ समजतो. प्रचंड संपत्ती असूनही सावकार सुखी नव्हता, कारण त्याचे मन भविष्यातील चिंतेने ग्रासले होते.***

एक श्रीमंत सावकाराकडे अमाप संपत्ती होती. सात पिढ्या बसून खातील इतके धन असूनही तो सुखी नव्हता. आठव्या पिढीची चिंता त्याची झोप उडवत होती. विवंचनेतून मुक्त होण्यासाठी तो संतांकडे गेला. एका साधूंनी त्याला तांदळाची पिशवी देऊन डोंगरावर राहणाऱ्या म्हातारीकडे पाठवले. ती म्हातारी अत्यंत गरिबीत असूनही भगवंताच्या भजनात तल्लीन होती. तिसऱ्या दिवसाच्या अन्नाचीही चिंता तिला नव्हती, कारण तिने पूर्ण विश्वास भगवंतावर ठेवला होता. हे पाहून श्रीमंताला खऱ्या सुखाचा अर्थ उमगला. संपत्ती असूनही चिंता करणारा तो दुःखी होता, तर अल्पात समाधान मानणारी म्हातारी सुखी होती. या कथेतून हेच शिकायला मिळते की खरे सुख संपत्तीत नसून समाधान, विश्वास आणि भजनात आहे.

तात्पर्य- या कथेचा संदेश असा आहे की खरे सुख संपत्तीत नसून समाधानात आहे. भोगापेक्षा भजन आणि चिंता करण्यापेक्षा समाधान हेच खरे सुख आहे.

लोकसंख्या आणि अर्थव्यवस्था यांचा परस्परसंबंध देशाच्या विकासावर थेट परिणाम करतो. उपलब्ध संसाधने आणि लोकसंख्या यांचा समतोल राखण्यासाठी अनेक देश लोकसंख्या नियमनाची धोरणे राबवतात. मात्र अशी धोरणे दीर्घकालीन दृष्टीने नवी संकटे निर्माण करू शकतात, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे चीन.

# लोकसंख्या, अर्थव्यवस्था आणि चीनचा अनुभव

चीनमध्ये अलीकडील आकडेवारीनुसार जन्मदर विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. २०२५ मध्ये सलग चौथ्या वर्षी चीनची लोकसंख्या घटली असून जन्मदर घटत असताना मृत्यूदर वाढत आहे. परिणामी लोकसंख्या घसरणीचा वेग वाढला आहे. या स्थितीमुळे चीनसमोर वृद्धांची वाढती संख्या हे मोठे संकट उभे राहिले आहे. सध्या ६० वर्षांवरील लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे २३ टक्के आहे आणि पुढील दशकात ती आणखी वाढण्याचा अंदाज आहे. याचा थेट परिणाम निवृत्तीवेतन, आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षेवर होत आहे.




जन्मदर घटत असल्याने रोजगारक्षम वयोगटातील लोकसंख्या कमी होत चालली आहे. त्यामुळे उत्पादनक्षमता घटणे, देशांतर्गत वापर कमी होणे आणि आर्थिक वाढ मंदावण्याचा धोका निर्माण झाला आहे. चीन 'श्रीमंत होण्याआधीच वृद्ध होणे' या अवस्थेत अडकला असल्याचे चित्र दिसते. भक्कम सामाजिक सुरक्षा व्यवस्था उभी राहण्याआधीच वृद्धांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे, ही चीनसाठी गंभीर बाब ठरली आहे.

या समस्यांची मुळे चीनच्या एक मूल सक्तीच्या धोरणात आढळतात. संसाधनांवरील ताण कमी करण्यासाठी १९७८ मध्ये हे धोरण राबवले गेले. सुरुवातीला लोकसंख्या वाढ नियंत्रित झाली, पण कालांतराने त्याचे दुष्परिणाम दिसू लागले. एकुलत्या अपत्यावर चार वृद्ध पालकांची जबाबदारी येऊ लागली. महिलांचे शिक्षण आणि रोजगारातील वाढता सहभाग, खर्चिक जीवनशैली आणि बदलते सामाजिक मूल्य यांमुळे विवाह व अपत्यसंख्या कमी करण्याची प्रवृत्ती वाढली. नंतर दोन व तीन मुलांची परवानगी, आर्थिक सवलती आणि प्रोत्साहने देऊनही जन्मदर वाढलेला नाही.

भारतासाठी चीनचा अनुभव महत्त्वाचा इशारा देणारा आहे. भारत सध्या सर्वाधिक लोकसंख्येचा देश असला तरी सक्तीच्या लोकसंख्या धोरणांपासून दूर राहणे आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य, स्त्री-सक्षमीकरण आणि प्रबोधन या मार्गांनी लोकसंख्येचा समतोल साधता येऊ शकतो. तसेच वाढत्या आयुर्मानाचा विचार करून वृद्धांसाठी सामाजिक सुरक्षा व्यवस्था बळकट करणे गरजेचे आहे.

याशिवाय केवळ मोठी लोकसंख्या म्हणजेच लोकसंख्याशास्त्रीय लाभांश नव्हे. तो लाभांश ठरवण्यासाठी रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास आणि विशेषतः महिलांचा कामगार दलातील सहभाग वाढवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्यथा लोकसंख्या वाढ ही संधी न ठरता भविष्यात मोठे ओझे ठरू शकते.

## ।। अभंगवाणी ।।



"जगी आलो जगावेगळा, ।
वाचे दर्शन घ्यावे, ॥१॥

नाव हरिपाठ करित राहो, ।
जीवन उजळावे." ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : सौरभ जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राजधानी दिल्लीत महाराष्ट्राचा नाद

## अहिल्यानगरची शाळा देशात पहिली, मुंबईच्या लेकींचाही डंका

**महाईन्यूज**

**नाशिक :** भारतीय प्रजासत्ताकाच्या ७७ व्या गौरवशाली सोहळ्याचे वारे दिल्लीत वाहू लागले असतानाच यंदा महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बँडच्या निनादाने देशाला भुरळ घातली आहे. प्रजासत्ताक दिन २०२६ च्या निमित्ताने संरक्षण मंत्रालय आणि शिक्षण मंत्रालयाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेचा महाअंतिम सोहळा दिल्लीतील राष्ट्रीय बाल भवन येथे पार पडला.




या मानाच्या स्पर्धेत महाराष्ट्रातील दोन शाळांनी उत्तुंग यश संपादन करून राज्याची मान अभिमानाने उंचावली आहे.

देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या १८ संघांच्या अटीतटीच्या लढतीत अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील संजीवनी सैनिक स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलांनी 'ब्रास बँड' श्रेणीत थेट प्रथम क्रमांकावर मोहर उमटवली. संजीवनीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या धूनने उपस्थित प्रेक्षकांसह परीक्षकांचीही मने जिंकली. दुसरीकडे मुंबईच्या विक्रोळी येथील डॉन बॉस्को हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यायाच्या मुलींच्या ब्रास बँड पथकाने आपल्या कौशल्याचे दर्शन घडवत तृतीय पारितोषिक पटकावले. महाराष्ट्राच्या या 'रणरागिणी' आणि 'बालसैनिकांच्या' कामगिरीचे दिल्लीच्या दरबारात कौतुक होत आहे.

संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांच्या हस्ते या विजेत्यांना रोख रक्कम, चषक आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे परीक्षण केले. प्रथम क्रमांकाच्या संजीवनी शाळेला ५१ हजार रुपये, तर डॉन बॉस्को शाळेला २१ हजार रुपयांचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. देशातील ७६३ शाळांमधून निवडले गेलेले तब्बल २,२१७ विद्यार्थी या प्रक्रियेत सहभागी झाले होते. राज्य आणि विभागीय पातळीवरील खडतर प्रवास पार करत हे विद्यार्थी राष्ट्रीय व्यासपीठापर्यंत पोहोचले. यात सीबीएसई, आयसीएसई आणि सैनिक स्कूल अशा विविध स्तरांवरील शाळांचा सहभाग होता. राष्ट्रीय स्पर्धेत १८ संघांनी ब्रास बँड व पाईप बँड श्रेणीत स्थान मिळवण्यासाठी लढा दिला. एकीकडे महाराष्ट्राने विजयाची गुढी उभारली असताना, तामिळनाडूच्या अविला कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांना कर्तव्य पथावर प्रजासत्ताक दिनी विशेष कला सादरीकरणाची संधी मिळाली आहे. थंडीने गारठलेल्या दिल्लीत कोपरगावच्या ग्रामीण भागातून निघालेला हा बँडचा आवाज आणि मुंबईच्या गजबजलेल्या विक्रोळीतून गेलेल्या मुलींची कामगिरी संपूर्ण देशात चर्चेचा विषय ठरली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनापूर्वीच मिळालेल्या या यशाने महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# कुडाळ गणात 'तिरंगी' शड्डू! सोमनाथ कदमांच्या अपक्ष उमेदवारीने प्रस्थापितांची झोप उडाली; 'जॉइंट किलर' ठरणार का?

**महाईन्यूज**

**सातारा :** जावली तालुक्यातील राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या कुडाळ पंचायत समिती गणाची निवडणूक आता एका अत्यंत चुरशीच्या वळणावर येऊन ठेपली आहे. आतापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गट आणि भाजप यांच्यात होणाऱ्या थेट लढतीचे चित्र सोमनाथ कदम यांच्या अपक्ष उमेदवारीने पूर्णपणे बदलले असून, येथे आता 'कांटे की टक्कर' पाहायला मिळत आहे.



> कुडाळ गणाला आज अशा नेतृत्वाची गरज आहे ज्याची प्रतिमा स्वच्छ असेल आणि ज्याने सत्तेचा वापर लोकसेवेसाठी केला असेल. सोमनाथ कदम यांनी सरपंच असताना दाखवलेले कर्तृत्व आणि त्यांचा जनसंपर्क पाहता, सामान्य जनता त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचे चित्र दिसत आहे.
>
> - किरण पवार, (सामाजिक कार्यकर्ते)

> राजकीय पक्षांच्या आश्वासनांना जनता कंटाळली आहे. सोमनाथ कदम हे लोकांच्या सुख-दुखात सहभागी होणारे कार्यकर्ते आहेत. ते अपक्ष असले तरी त्यांचा वैयक्तिक दांडगा संपर्क हीच त्यांची ताकद आहे. यंदा कुडाळ गणात परिवर्तनाची लाट असून कदम साहेब नक्कीच बाजी मारतील असा आम्हाला विश्वास आहे.
>
> - नितीन मोरे,(कार्यकर्ते)

### निवडणुकीचे कळीचे मुद्दे:

**स्वच्छ प्रतिमा:** भ्रष्टाचाराचा एकही डाग नसलेले नेतृत्व ही कदमांची मोठी ताकद.
**थेट संवाद:** जाहीर सभांचा गाजावाजा करण्याऐवजी गृहभेटी आणि वैयक्तिक गाठीभेटींवर भर.
**कोणाचे गणित बिघडणार ?:** सोमनाथ कदम यांना मिळणारी मते राजेंद्र शिंदे की सौरभ शिंदे, यांपैकी कोणाची डोकेदुखी वाढवणार? यावरच विजयाचे समीकरण अवलंबून आहे.
"मतदारांचा वाढता प्रतिसाद पाहता कुडाळ गणात यावेळी 'भाऊबंदकी' आणि 'पक्षीय राजकारण' बाजूला सारून विकासाला आणि प्रामाणिकपणाला कौल मिळतो का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल."

### बड्या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

या गणात राष्ट्रवादी ( शरद पवार) गटाकडून आमदार शशिकांत शिंदे यांचे कट्टर समर्थक राजेंद्र शिंदे रिंगणात आहेत, तर भाजप व महायुतीकडून आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे समर्थक सौरभ शिंदे नशीब आजमावत आहेत. या दोन प्रस्थापित शक्तींसमोर कुडाळचे उपसरपंच सोमनाथ कदम यांनी अपक्ष उमेदवारी जाहीर करत आव्हान उभे केले आहे. कदम यांच्या एन्ट्रीमुळे प्रस्थापित

### बड्या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

या गणात राष्ट्रवादी ( शरद पवार) गटाकडून आमदार शशिकांत शिंदे यांचे कट्टर समर्थक राजेंद्र शिंदे रिंगणात आहेत, तर भाजप व महायुतीकडून आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे समर्थक सौरभ शिंदे नशीब आजमावत आहेत. या दोन प्रस्थापित शक्तींसमोर कुडाळचे उपसरपंच सोमनाथ कदम यांनी अपक्ष उमेदवारी जाहीर करत आव्हान उभे केले आहे. कदम यांच्या एन्ट्रीमुळे प्रस्थापित पक्षांच्या गोटात कमालीची अस्वस्थता पसरली आहे.

# कर्तव्यपथावर यंदा ‘मूक योद्ध्यांचा’ जयघोष

## बॅक्ट्रियन उंट, झांस्करी घोडे, शिकारी पक्षी तसेच भारतीय श्वान

**महाईन्यूज**

**नवी दिल्ली : प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर होणारे संचलन हे लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचेच आकर्षण असते. विविध राज्यांची संस्कृती, कला, परंपरा उलगडणारे चित्ररथ, प्रशासनाच्या कार्याचा आढावा देणारी पथके आणि देशाच्या सुरक्षा यंत्रणांकडून सादर होणारी थरारक प्रात्यक्षिके पाहण्यासाठी देश-विदेशातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.**



त्यामुळे दरवर्षी संचलनात काहीतरी वेगळे, नवे सादर करण्याचा प्रयत्न केला जातो. यंदाही सोमवारी होणाऱ्या या संचलनामध्ये अनेक उल्लेखनीय चित्ररथ आणि पथके पाहायला मिळणार असून, त्यातील एक प्रमुख आकर्षण असणार आहे ते भारतीय लष्कराचे प्राणी-पक्षी पथक.

दरवर्षीप्रमाणे यंदाही अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, रणगाडे आणि जवानांची शिस्तबद्ध प्रात्यक्षिके संचलनात दिसणार आहेतच; मात्र यंदा लष्कराच्या ताफ्यात रिमाउंट अँड व्हेटरनरी कोअर (RVC) या शाखेतील अनोखे ‘मूक योद्धे’ सहभागी होत आहेत. या पथकात दोन मदार असलेले बॅक्ट्रियन उंट, झांस्करी घोडे, शिकारी पक्षी तसेच भारतीय श्वान जातींचा समावेश आहे. देशाच्या संरक्षणासाठी प्रतिकूल परिस्थितीत काम करणाऱ्या या प्राण्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी त्यांना कर्तव्यपथावर स्थान देण्यात आले आहे.

### युद्धभूमीवरील प्राण्यांची परंपरा

युद्धात किंवा संरक्षणासाठी प्राणी-पक्ष्यांचा वापर ही संकल्पना नवी नाही. प्राचीन काळापासून विविध संस्कृतींमध्ये प्राण्यांची कौशल्ये ओळखून त्यांचा युद्धनीतीत वापर केला गेला आहे. संदेशवहनासाठी कबुतरे, हेरगिरीसाठी शिकारी पक्षी, तर समुद्रात डॉल्फिनसारख्या प्राण्यांचा वापर झाल्याची उदाहरणे इतिहासात आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही काही मोहिमांमध्ये मधमाश्यांचा वापर केल्याचे उल्लेख सापडतात.

### बॅक्ट्रियन उंट आणि झांस्करी घोडे

यंदाच्या संचलनात विशेष लक्ष वेधून घेणार आहेत बॅक्ट्रियन उंट. लडाखसारख्या १५ हजार फुटांहून अधिक उंचीवरील, उणे तापमानाच्या प्रदेशात हे उंट २५० किलोपर्यंत ओझे वाहू शकतात. ऑक्सिजनची कमतरता असलेल्या भागातही ते सहज तग धरतात. त्यांच्या सोबतीला असणारे झांस्करी घोडेही अतिशय प्रतिकूल हवामानात चपळाईने काम करतात.


### हिमालयापासून वाळवंटापर्यंत योगदान

भारतीय लष्करामध्ये आजही प्राण्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. हिमालयातील दुर्गम, उंच भागांमध्ये रसद, इंधन आणि शस्त्रास्त्रे पोहोचवण्यासाठी खेचरांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. एकदा मार्ग शिकला की तो न विसरणारी त्यांची क्षमता जवानांसाठी मोलाची ठरते. अशाच एका खेचराची – ‘पेडोंगी’ – शौर्यगाथा आजही लष्करात सांगितली जाते.

# अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्म विभूषण पुरस्कार

**महाईन्यूज**

**मुंबई : अभिनेते धर्मेंद्र यांना त्यांच्या कला क्षेत्रातील गौरवाबद्दल पद्म विभूषण या सन्मानाने गौरवण्यात आलं आहे. धर्मेंद्र यांना हा पुरस्कार मरणोत्तर दिला जाणार आहे. चित्रपटसृष्टीतील त्यांच्या योगदानाबाबत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.**






धर्मेंद्र यांच्यासह शिबू सोरेन यांना राजकीय क्षेत्रातील योगदानासाठी मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तर महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांना पद्म भूषण पुरस्कार देऊन गौरव केला जाणार आहे. त्याच प्रमाणे अलका याज्ञिक यांनाही पद्म भूषण पुरस्कार दिला जाणार आहे. तर जाहिरात लेखक पियुष पांडे यांनाही मरणोत्तर पद्म भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हॉलिवूडमध्ये जसा अरनॉल्ड त्याचा काळ गाजवत होता तसा आपल्याकडे आपल्या देशी मातीतला हिरो आहे ज्याचं नाव आहे धर्मेंद्र. १९६० च्या दशकात तो आला. ‘दिल भी तेरा हम भी तेरे’, ‘शोला और शबनम’, ‘अनपढ’, ‘शादी’, ‘बंदिनी’, ‘बेगाना’, ‘आयी मिलन की बेला’, ‘पुर्णिमा’, ‘फुल और पत्थर’, ‘देवर’, ‘अनुपमा’, ‘आये दिन बहार के’ या सिनेमांमधून त्याच्या अभिनयाची जादू दाखवत राहिला. ‘मेरा नाम जोकर’मधला त्याने साकारलेला सर्कसचा मालक आठवा. ‘यादो की बारात’ सिनेमातला शंकर आठवा. अजितच्या पायात ८ आणि ९ नंबरचा बूट पाहून चिडणारा. लहानपणी ताटातूट झालेल्या भावांची ओळख ‘यादो की बारात निकली है आज’ गाणारा शंकर, आपल्या भावांना, कुटुंबाला वाचवण्याची धडपड करणारा शंकर सगळ्यामध्ये धर्मेंद्र अगदी चपखल बसला आहे. ‘ड्रीम गर्ल’, ‘सीता और गीता’, ‘चुपके चुपके’ या सिनेमातल्या त्याच्या भूमिकाही खास गाजल्या. अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जया भादुरी, शर्मिला टागोर, ओमप्रकाश अशी तगडी स्टार कास्ट असलेल्या ‘चुपके चुपके’ सिनेमात धर्मेंद्रने त्याच्यात विनोदी अभिनेताही लपला आहे हे दाखवून दिलं. ऋषिकेश मुखर्जींचं दिग्दर्शन आणि इतक्या सगळ्या कलाकारांची फौज यात ओम प्रकाशची जिरवताना ‘प्यारे मोहन’ बनून त्याने जी काही धमाल केली आहे ती केवळ अविस्मरणीय. त्यांच्या या सगळ्या योगदानाचा गौरव भारत सरकारने केला आहे. त्यांना पद्म विभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

### धर्मेंद्र यांना २०१२ मध्ये पद्म भूषण पुरस्कार

धर्मेंद्र यांनी त्यांच्या कारकिर्दीत विविध शेड्स असलेल्या भूमिका साकारल्या. पण ते वंचित राहिले ते पुरस्कारांपासून त्यांना नॉमिनेशन मिळालं पण पुरस्कार मिळाला नाही. वाट्याला आले ते पुरस्कार कोणते होते? तर बेस्ट फिल्मचा पुरस्कार मिळाला घायल सिनेमाचे निर्माते म्हणून. १९९७ ला मिळाला लाईफटाईम अचिव्हमेंट पुरस्कार. १९६० ते २०२३ अशी जबरदस्त प्रदीर्घ सिनेकारकीर्द असूनही आपल्या वाटणाऱ्या धर्मेंद्रच्या वाट्याला पुरस्कार आले ते असेच. २०१२ मध्ये सिनेसृष्टीतल्या कारकिर्दीबाबत पद्म भूषण पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आलं. मात्र फिल्मफेअर किंवा अगदी सहाय्यक अभिनेता म्हणूनही त्याला पुरस्कार मिळाला नाही. आता त्यांना मरणोत्तर पद्म विभूषण या पुरस्काराने गौरवण्यात आलं आहे.

# सलग 9 तास काम, फोटो शेअर करत सांगितला अनुभव



दक्षिण चित्रपटसृष्टीतील राष्ट्रीय पुरस्कार विजेती अभिनेत्री कीर्ती सुरेश आपल्या मेहनतीसाठी आणि प्रोफेशनल वृत्तीसाठी ओळखली जाते. नुकताच तिने सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका फोटोने चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. या फोटोसोबत कीर्तीने सांगितलं की, तिने आपल्या आगामी चित्रपटासाठी सलग ९ तास डबिंग केलं. इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या या फोटोमध्ये कीर्ती (KEERTHY SURESH) डबिंग स्टुडिओतील खुर्चीवर बसलेली दिसते. चेहऱ्यावर थकवा असला तरी काम पूर्ण झाल्याचं समाधान तिच्या हसण्यातून स्पष्ट दिसत आहे. समोर माइक लावलेला असून, दीर्घकाळ चाललेल्या डबिंग सेशननंतरचा तिचा हा क्षण आहे.

कोणत्या चित्रपटासाठी डबिंग?

फोटोसोबतच्या कॅप्शनमध्ये कीर्तीने लिहिलं, "काल ९ तासांच्या डबिंगनंतर दिवसाच्या शेवटी मी अशी दिसत होते." मात्र, तिने नेमकं कोणत्या चित्रपटासाठी डबिंग केलं, हे सांगितलेलं नाही. त्यामुळे चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, काहीजण 'रिव्हॉल्वर रीटा' तर काही तिच्या आगामी बॉलिवूड चित्रपटाचा अंदाज लावत आहेत. सलग इतक्या तास डबिंग करताना आवाजात सातत्य ठेवणं हे कोणत्याही कलाकारासाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या आव्हानात्मक असतं. मात्र कीर्तीने हे आव्हान यशस्वीपणे पेलल्याचं दिसत आहे. बालकलाकार ते राष्ट्रीय पुरस्कार विजेती कीर्ती सुरेशचा प्रवास खूप प्रेरणादायी आहे. तिने लहानपणी मलयाळम चित्रपटांमधून बालकलाकार म्हणून कारकीर्द सुरू केली. २०१३ मध्ये 'गीतांजली' चित्रपटातून नायिकेच्या भूमिकेत पदार्पण केल्यानंतर, 'महानती' या चित्रपटातून तिला खरी ओळख मिळाली. दिग्गज अभिनेत्री सावित्री यांच्या भूमिकेसाठी कीर्तीला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. अभिनयासोबत फॅशन डिझायनिंगही अभिनयाव्यतिरिक्त कीर्ती सुरेश (KEERTHY SURESH ) ही प्रशिक्षित फॅशन डिझायनर देखील आहे. तिने लंडनमध्ये फॅशन डिझायनिंगची इंटर्नशिप पूर्ण केली असून, भविष्यात स्वतःचा फॅशन बुटीक सुरू करण्याची तिची इच्छा आहे. सध्या ती आपल्या आगामी चित्रपटांच्या तयारीत व्यस्त असून, पुन्हा एकदा प्रेक्षकांना आश्चर्यचकित करण्यासाठी सज्ज आहे.



# "कमरेवर हात ठेवला अन् अश्लील हावभाव..." वृद्ध पुरुषांकडून गैरवर्तन

अभिनेत्री मौनी रॉयने हिंदी मालिकांसह चित्रपटांमध्येही काम केले आहे. तिचा देशभरात मोठा चाहता वर्ग देखील आहे. मात्र सध्या ती एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. हरियाणातील करनाल येथे झालेल्या एका कार्यक्रमादरम्यान तिच्या सोबत झालेल्या गैरवर्तनाबाबत मौनीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत संताप व्यक्त केला आहे. मौनी रॉयने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये कार्यक्रमादरम्यान प्रेक्षकांमधील काही व्यक्तींनी अशोभनीय वर्तन केल्याचा आरोप केला आहे. एका वयस्कर माणसाने तिच्याकडे बघून अश्लील हावभाव केल्याचा धक्कादायक खुलासा तिने केला आहे. मौनी रॉयची पोस्ट – मौनीने लिहिलं की, "काल करनालमध्ये एक कार्यक्रम होता आणि तिथे उपस्थित काही पाहुण्यांच्या वागणुकीमुळे मी खूप अस्वस्थ झाले. विशेषतः विशेषत: दोन अंकल जे आजोबांच्या वयाचे असतील. इव्हेंट सुरु झाला आणि मी स्टेजवर जात होते तेव्हा परिस्थिती अस्वस्थ करणारी झाली. फोटो काढण्याच्या नावाखाली काही पुरुषांनी माझ्या कमरेवर हात ठेवला. मी तात्काळ त्यांना हात हटवण्यास सांगितलं, पण त्यांना ते आवडलं नाही," असं तिने पोस्टमध्ये नमूद केलं. ....अशा प्रकारे लोक आम्हाला त्रास देतात हे दुर्दैवी आणखी एक गोष्ट म्हणजे स्टेज उंचीवर होता आणि हे दोन अंकल खालच्या अँगलने व्हिडीओ घेत होते. कोणीतरी त्यांना थांबवलं तर त्यांनी त्यालाही शिव्या दिल्या. माझं आपल्या देशावर प्रेम आहे, इथल्या माणसांवर आहे पण अशी माणसं? हे असे पुरुष? त्यांच्या कुटुंबातील महिलांसोबत कोणी असं वागलं असतं तर त्यांनी ते सहन केलं असतं का?



# बेबोचा कॅज्युअल लूक! व्हिडिओ व्हायरल

बॉलिवूड इंडस्ट्रीत 'बेबो' या नावाने परिचित असणारी अनेकांची आवडती अभिनेत्री करीना कपूर खान ही नेहमी तिच्या हटक्या स्टाइलमुळे चर्चेत असते. नुकतीच ती मुंबई विमानतळावर स्पॉट झाली. यावेळी पापाराझींनी तिला आपल्या कॅमेऱ्यात कैद केले. करीना तिच्या आगामी "दायरा"(DAAYRA) चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण जवळजवळ पूर्ण झाले असून, टीमकडून पोस्ट-प्रॉडक्शनचे काम सुरू आहे. या दरम्यान, करीनाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ती मुंबई विमानतळावर कॅज्युअल लूकमध्ये दिसत आहे. करीना कपूर खान ( KAREENA KAPOOR) मुंबई विमानतळावर पोहोचली त्यानंतर पापाराझींनी तिचे फोटो काढले. यावेळी तिने निळ्या रंगाची जीन्स आणि लाल स्वेटशर्ट असा कॅज्युअल लूक वेअर केला होता. या लूकमध्ये तिची अनोखी स्टाइल पुन्हा एकदा चाहत्यांना मोहित करून गेली. यावेळी करीनाने काळ्या रंगाचा चष्मा डोळ्यांवर घातला होता. या व्हिडिओवर चाहत्यांना कमेंट्स करत लूकची प्रशंसा केली आहे. एका चाहत्याने लिहिले, 'बेबो इज द क्वीन', दुसऱ्या चाहत्याने विचारले, 'तुझा 'दायरा' चित्रपट कधी प्रदर्शित होत आहे?' दायरा (DAAYRA) चित्रपटाचे दिग्दर्शन मेघना गुलजार यांनी केले आहे. हा एक क्राइम-ड्रामा थ्रिलर चित्रपट आहे. या चित्रपटात करीना कपूर खान आणि पृथ्वीराज सुकुमारन मुख्य झळकणार आहेत. गुन्हेगारी, न्याय आणि समाजाच्या गुंतागुंतीचा शोध चित्रपटाच्या कथेतून घेतला जाणार आहे. अभिनेता पृथ्वीराज चित्रपटात एका पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहे आणि करीना कपूर खान देखील दमदार भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे.

# पाकिस्तानचे वरातीआधीच घोडे

## टी-२० वर्ल्डकप खेळणार का ठरण्याआधीच संघ जाहीर

महाईन्यूज

**नवी दिल्ली :** पाकिस्तान आणि अतरंगी घडामोडी यांचं नातं जुनं आहे. बांगलादेशने टी२० वर्ल्डकपमधून माघार घेतल्याप्रकरणी पाठिंबा म्हणून पाकिस्तान क्रिकेट बोर्डही स्पर्धेवर बहिष्कार टाकण्याच्या विचारात आहे. पडद्यामागे पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आणि सरकार यांच्यात यासंदर्भात बोलणी सुरू असताना पाकिस्तानने स्पर्धेसाठी संघ जाहीर केला आहे.



### पाकिस्तानचा संघ

सलमान अघा (कर्णधार), फखर झमान, साहिबजादा फरहान, अबरार अहमद, बाबर आझम, फहीम अशरफ, ख्वाजा नफाय, मोहम्मद नवाझ, सलमान मिर्झा, नसीम शहा, सईम अयुब, शाहीन शहा आफ्रिदी, शदाब खान, उस्मान खान, उस्मान तारीक.

वर्ल्डकपसाठी तयारी म्हणून पाकिस्तानचा संघ मायदेशात ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी२० मालिका खेळणार आहे. त्या मालिकेसाठी जाहीर संघाशी मिळताजुळता असा संघच पाकिस्तानने जाहीर केला आहे.

निवडसमिती म्हणून आमचं काम संघ निवडणं आहे आहे. आयसीसीने वर्ल्डकपसाठी संघनिवडीकरता निर्धारित तारीख दिली आहे. त्यानुसार आम्ही संघाची घोषणा केली. वर्ल्डकपमध्ये खेळायचं की नाही याचा निर्णय सरकार घेईल. मी त्यासंदर्भात काही बोलू शकत नाही असं पाकिस्तानचे मुख्य प्रशिक्षक आकिब जावेद यांनी सांगितलं.

सलमान अघाकडेच नेतृत्वाची धुरा कायम राखण्यात आली आहे. टी२० प्रकारात कमीत कमी चेंडूत जास्तीत जास्त धावा फटकावणे हे अत्यावश्यक मानलं जातं. स्ट्राईकरेट तगडा असणं फलंदाजांसाठी गरजेचं असतं. प्रदीर्घ काळ टी२० प्रकारात संथ स्ट्राईकरेटने खेळण्यावरून माजी कर्णधार बाबर आझमवर टीका करण्यात आली. ऑस्ट्रेलियात बिग बॅश स्पर्धेतही बाबरला लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नाही. टी२० प्रकारात कामगिरी सर्वसाधारण असतानाही बाबरला या संघात स्थान मिळालं आहे. बाबर आणि त्याचा सहकारी मोहम्मद रिझवान यांना टी२० संघातून डच्चू देण्यात आला होता. बाबरचं पुनरागमन झालं असलं तरी रिझवानला राष्ट्रीय संघात खेळण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे. ख्वाजा नफाय आणि साहिबजादा फरहान यष्टीरक्षणाची जबाबदारी सांभाळतील.

अनुभवी फखर झमानकडून पाकिस्तानला मोठ्या खेळीची अपेक्षा असेल. कामगिरीत सातत्य नसतानाही सईम अय्युबने संघात स्थान कायम राखलं आहे. अष्टपैलू फहीम अशरफमुळे संघाला संतुलन मिळालं आहे.

बिग बॅश लीग स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स पटकावणाऱ्या हॅरिस रौफचा या संघात निवड होऊ शकलेली नाही. शाहीन शहा आफ्रिदी गोलंदाजी आक्रमणाचा प्रमुख असेल. सलमान मिर्झा आणि नसीम शहा त्याचे सहकारी असतील. शदाब खान, मोहम्मद नवाझ, अबरार अहमद आणि उस्मान तारीक ही चौकडी फिरकी आक्रमण सांभाळेल.

पाकिस्तान संघाने वर्ल्डकप खेळायचं ठरवल्यास त्यांचा पहिला सामना ७ फेब्रुवारीला कोलंबो इथे नेदरलँड्सविरुद्ध होणार आहे. अ गटात पाकिस्तानसह भारत, अमेरिका, नेदरलँड्स आणि नामिबिया यांचा समावेश आहे. भारत-पाकिस्तान सामना १५ फेब्रुवारीला कोलंबो इथे होणार आहे.

२००७ मध्ये पहिल्यावहिल्या टी२० वर्ल्डकप स्पर्धेत पाकिस्तानने अंतिम फेरीत धडक मारली होती. मात्र भारताने थरारक विजय मिळवला होता. त्यानंतर दोन वर्षांनी पाकिस्तानने जेतेपदाची कमाई केली होती. त्यानंतर १७ वर्ष टी२० वर्ल्डकपच्या जेतेपदाने पाकिस्तानला दुरावलं आहे.

# ऑस्ट्रेलियन खुली टेनिस स्पर्धा: जोकोविचची विक्रमी घोडदौड

महाईन्यूज

**नवी दिल्ली :** वाढत्या वयाचे आव्हान विसरून ३८व्या वर्षी ऑस्ट्रेलिया खुल्या स्पर्धेत खेळणाऱ्या नोव्हाक जोकिवचने शनिवारी विक्रमी घोडदौड कायम राखली. जोकोविचने चौथी फेरी गाठताना बोटिक वॅन डे झँडशुल्पचा ६-३, ६-४, ७-६ (७-४) असा पराभव केला. ग्रँडस्लॅम कारकीर्दीमधील जोकोविचचा हा ४००वा, तर ऑस्ट्रेलिया स्पर्धेतील १०२ वा विजय ठरला.

### अनोखी कामगिरी...

जोकोविचने तीन वेगवेगळ्या प्रकारच्या कोर्टवर शंभर किंवा त्याहून अधिक विजय मिळविण्याचा अनोखा विक्रम केला आहे. अशी कामगिरी करणारा तो एकमेव टेनिसपटू आहे. जोकोविचने गवतच्या कोर्टवर होणाऱ्या विम्बल्डनमध्ये १०२ विजय, लाल मातीच्या कोर्टवरील फ्रेंच स्पर्धेत १०१ विजय मिळवले आहेत. यंदा ऑस्ट्रेलियन स्पर्धेत पहिल्या फेरीचा अडथळा पार करताना जोकोविचने हार्ड कोर्टवर १०० विजय पूर्ण केले होते.

एकेरीमध्ये ४०० विजय मिळविणारा जोकोविच एकमेव टेनिसपटू ठरला असून, ऑस्ट्रेलियन स्पर्धेत सर्वाधिक सामने जिंकण्याच्या रॉजर फेडररच्या विक्रमाशीही त्याने बरोबरी केली आहे. जोकोविचने ऑस्ट्रेलियन स्पर्धा सर्वाधिक दहा वेळा जिंकली आहे. या वेळी तो २५व्या ग्रँडस्लॅम विजेतेपदासाठी खेळत आहे. ही कामगिरी जोकोविचकडून झाल्यास, तो टेनिस इतिहासातील सर्वकालीन सर्वाधिक यशस्वी टेनिसपटू ठरेल.

झँडशुल्पविरुद्धच्या सामन्यात सुरुवातीपासूनच जोकोविचचे वर्चस्व होते आणि तिसऱ्या सेटमधील काही क्षण वगळता त्याला कोणतीही अडचण आली नाही. तिसऱ्या गेममध्ये तो अडखळून कोर्टवर पडला आणि नंतर १२व्या गेममध्ये त्याला दोन सेट पॉइंट्सचा सामना करावा लागला. हे दोन क्षण वगळता जोकोविचचा खेळ त्याच्या लौकिकाला साजेसा असाच झाला.



“ऑस्ट्रेलियातील उष्मा वाढत असताना मला रात्रीचा सामना खेळावा लागला हे खूप चांगले झाले. या वेळी शरीर चांगले साथ देत आहे. त्यामुळे या सामन्यात कोर्टवर पडताना स्वतःला सावरले. अन्यथा परिस्थिती बिकट झाली असती. गेल्या वर्षी चारही ग्रँडस्लॅम स्पर्धात उपांत्य फेरीत आव्हान गमवावे लागले होते. त्यामुळे यंदा चांगली कामगिरी होत असली, तरी फारसा हुरळून जाणार नाही,” असे जोकोविच म्हणाला.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
# महाईन्यूज ™
ePaper
। सोमवार ।
दि. 26 जानेवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# महापालिकेचा अर्थसंकल्प मार्चमध्ये..!




## लोकप्रतिनिधींच्या काळातील पहिल्या अर्थसंकल्पाकडे शहरवासीयांचे लक्ष

**महाईन्यूज**

**पिंपरी:** **पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प मार्च महिन्यात सादर होण्याची शक्यता आहे. प्रशासकीय राजवट संपून लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ सुरू झाल्यानंतर सादर होणारा हा पंचवार्षिकमधील पहिलाच अर्थसंकल्प असणार असल्याने, शहरवासीयांमध्ये या अर्थसंकल्पाबाबत विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे.**




### विकासकामे आणि मूलभूत सुविधांवर भर

सध्या सुरू असलेली विकासकामे, अपूर्ण प्रकल्प तसेच पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी आवश्यक निधीची स्पष्ट मागणी सादर करण्याचे निर्देश विभागप्रमुखांना देण्यात आले आहेत. निवडणुकीनंतर सादर होणारा हा अर्थसंकल्प असल्याने, प्रशासकीय पातळीवर संतुलित आणि वास्तववादी अर्थसंकल्प मांडण्यावर भर दिला जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत. याशिवाय वाहतूक व्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण आणि नागरी सुविधा सुधारणा या क्षेत्रांनाही प्राधान्य दिले जाण्याची शक्यता आहे. सर्व विभागांकडून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे लेखा व वित्त विभाग एकत्रित अर्थसंकल्प तयार करणार असून, तो मार्च महिन्यात सादर केला जाणार आहे.

### करसवलतींबाबत नागरिकांची अपेक्षा

लोकप्रतिनिधींच्या कार्यकाळातील हा पहिलाच अर्थसंकल्प असल्याने, शहरवासीयांचे लक्ष त्यातून मिळणाऱ्या संभाव्य सवलतींकडे लागले आहे. मालमत्ता करात सूट मिळणार का, रेड झोनमधील मालमत्तांवरील करदर कमी होणार का, पाणीपट्टीचे दर घटणार का, अशा विविध मुद्द्यांवर नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

### विभागांकडून माहिती संकलन सुरू

महापालिकेच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पासाठी प्राथमिक बैठक पार पडली असून, आयुक्तांनी याबाबत आढावा घेतला आहे. त्यानुसार सर्व विभागांकडून आवश्यक माहिती मागवण्याचे काम सुरू आहे. अर्थसंकल्प मार्च महिन्यात सादर करण्याचे नियोजन असल्याची माहिती महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी दिली आहे.

साधारणतः महापालिकेचा अर्थसंकल्प फेब्रुवारी महिन्यात सादर केला जातो. मात्र यंदा ६ फेब्रुवारी रोजी महापौरपदाची निवड होणार असून, त्यानंतर महापालिकेचे कामकाज पुन्हा लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून सुरू होणार आहे. त्यामुळे सत्ताधारी भाजपच्या धोरणांनुसार अर्थसंकल्पावर राजकीय छाप असण्याची शक्यता असून, नव्या पदाधिकाऱ्यांकडून मार्च महिन्यात अर्थसंकल्प मांडला जाणार आहे.

**अर्थसंकल्पाची तयारी सुरू**

दरम्यान, महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी अर्थसंकल्पाच्या तयारीसंदर्भात विभागप्रमुखांची प्राथमिक बैठक घेतली आहे. या बैठकीत त्यांनी सर्व विभागांना आगामी आर्थिक वर्षासाठी आवश्यक माहिती वेळेत सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. लेखा व वित्त विभागाने त्यानुसार सर्व विभागांकडून माहिती संकलनाची प्रक्रिया सुरू केली आहे.



आगामी वर्षातील संभाव्य उत्पन्न, अपेक्षित खर्च, प्रलंबित विकासकामे तसेच नव्या विकास प्रकल्पांचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने हा टप्पा महत्त्वाचा मानला जात असून, प्रत्येक विभागाकडून मागील वर्षातील प्रत्यक्ष खर्च, अपेक्षित महसूल, करआकारणी, शासनाकडून मिळणारी अनुदाने, भांडवली व महसुली खर्चाचा तपशील मागवण्यात आला आहे.

Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)

Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046